**विषय:- कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोन करणेकामी वाहन विभागातील इतर लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणे**

**मे. सादर,**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ. २०२०/७१(भाग-२)/ नवि-१४, दिनांक.०६/०६/२०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या पोट-कलमान्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे अधिकार आहे. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतुद करणे हे मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकार आहे. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले जातात. त्याप्रमाणे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतुद करण्यात आली होती. या तरतुदी मधुन आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील नमुद केल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२३-२४ करीता करण्यात आलेली तरतुद | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | दि.२९/०५/२०२३ पर्यतची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १ | वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टायर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी | रु.१३५.०० लक्ष | रु.२४.६२ लक्ष | रु.११०.३८ लक्ष |
| २ | कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे. | रु.८०.०० लक्ष | रु. ७९.९७ लक्ष | रु.०.०३ लक्ष |
| ३ | मालमत्ता व वाहनांचा विमा | रु.३६.०० लक्ष | रु.२.२१ लक्ष | रु.३३.७८ लक्ष |
| ४ | वाहन भत्ता | रु.६०.०० लक्ष | निरंक | रु.६०.०० लक्ष |
| ५ | महानगरपालिकेच्या वाहनांनासाठी पेट्रोल, डिझेल व ऑईल इत्यादी खरेदी | रु.१३०.०० लक्ष | रु.८.९५ लक्ष | रु.१२१.०५ लक्ष |
| ६ | वाहने खरेदी | रु.१५०.०० लक्ष | रु.६१.८५ लक्ष | रु.८८.१५ लक्ष |

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेकडे असलेल्या १५ वर्षापेक्षा जास्त जुन्या ४८ वाहनांचा वापर बंद करण्यात आला असुन व प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे मार्फत MSTC या संकेतस्थळावर सदर वाहनांची लिलाव प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तसेच महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाकरीता नविन डंपर व टँकर वाहने खरेदी करणे कामी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

महानगरपालिकेची सर्व डंपर, टँकर, जेसीबी वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे मार्फत राबविण्यात आलेल्या लिलाव प्रक्रीयेत समाविष्ठ असल्याने प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे अतिक्रमण व रोड खाते विभागास प्रत्येकी डंपर व उद्यान विभागास एक टँकर व प्रभाग समिती क्र.३ व ४ करीता प्रत्येकी एक जीप वाहन भाडेतत्त्वावरील पुरविण्यात आले आहे. सदर भाडेतत्त्वावरील वाहने उपलब्ध करणे कामी कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मधील आर्थिक तरतुदीचा वापर करण्यात आला असल्याने कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मध्ये मार्च २०२४ पर्यत निधीची कमतरता आहे.

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले अधिकारी वर्ग यांना कार्यालयीन कामाकरिता वाहने पुरविणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली मोहिम राबविणे कामी भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे, पल्स पोलिओ मोहिमेकामी भाडेतत्वावर जीप वाहने पुरविणे, तसेच धार्मिक सणांच्या कालावधीमध्ये प्रशासकीय कामकाजाकरीता भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे कामी निधीची कमतरता आहे. कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या वाहन विभागातील कामांची यादी व अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष व कामाचे नाव<br>कार्यालयीन कामाकरीता भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे. | रक्कम |
|---|---|---|
| १ | मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी सो., मा. शहर अभियंता श्री. सुनिल घुगे सो, मा. सहाय्यक आयुक्त श्रीम.प्रणाली घोंगे मॅडम, मा. सहाय्यक आयुक्त श्रीम. अनुराधा बाबर मॅडम, मा. सहा. आयुक्त श्रीम. प्रिती गाडे मॅडम, मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी सो., निवडणुक विभाग, व मा. सहा. आयुक्त (आस्थापना विभाग) यांना कार्यालयीन कामाकरिता माहे जुलै २०२३ ते मार्च २०२४ (९ महीने) या कालावधीकरीता ८ (आठ) भाडेतत्वावर वाहने भाडेतत्त्वावर पुरविणे. | रु.५३,००,०००/- |
| २ | घरपट्टी पाणीपट्टी वसुली मोहिमराबविणे कामी प्रभाग समिती क्र. १ ते ५ करीता ५ जीप वाहने दोन महिने कालावधीकरीता भाडेत्त्वावरील वाहने पुरविणे (अंदाजे खर्च रु.१० लक्ष) पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे करिता (अंदाजे ०३ मोहिमे कामी) भाडेत्त्वावरील वाहने पुरविणे. (अंदाजे खर्च रु.५.४ लक्ष) | रु.१६,००,०००/- |
| ३ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता नविन टँकर, जीप वाहने खरेदी करणे कामीची निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यत अंदाजे १ महिने भाडेतत्तवावरील वाहने पुरविणे. | रु.४,३९,०००/- |
| ४ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता धार्मिक सणांच्या कालावधीत भाडेतत्तवावरील वाहने पुरविणे. | रु.६,००,०००/- |
| | | |
| | **एकुण** | **रु.७९,३९,००० /-** |

तरी वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत मार्च २०२४ पर्यंत खर्च करणे कामी रु.१५ लक्ष मात्र तरतुद शिल्लक असुन तरतुद अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहन भत्ता लेखाशिर्षात रु.६० लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.२५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे. व वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टायर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी या लेखाशिर्षात रु.११० लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन रु.५० लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे. व महानगरपालिकेच्या वाहनांनासाठी पेट्रोल, डिझेल व ऑईल इत्यादी खरेदी या लेखाशिर्षात रु.१२१ लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन रु.५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे कामीच्या पुर्नविनियोजन प्रस्तावास मा. आयुक्त सो यांनी मंजुरी प्राप्त झाली आहे

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेस कार्यालयीन कामाकरिता मासिक भाडेदरावर वाहने पुरविणे कामीच्या प्रस्तावास मा. महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा. महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** २९८

**दिनांक :-** 30/६/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ. २०२०/७१(भाग-२)/ नवि-१४, दिनांक.०६/०६/२०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या पोट-कलमान्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे अधिकार आहे. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतुद करणे हे मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकार आहे. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले जातात. त्याप्रमाणे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मध्ये रु.८० लक्ष आर्थिक तरतुद करण्यात आली होती.

सदर भाडेतत्त्वावरील वाहने उपलब्ध करणे कामी कार्यालयीन कामाकरीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मधील आर्थिक तरतुदीचा वापर करण्यात आला असल्याने कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मध्ये तरतुद अपुरी असल्याने व मार्च २०२४ उपरोक्त कामाकरिता निधीची आवश्यकता लागणार आहे.

तरी वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत मार्च २०२४ पर्यंत तरतुद अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहन भत्ता लेखाशिर्षात रु.६० लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.२५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषात वर्ग करणे व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेकडे असलेल्या १५ वर्षापेक्षा जास्त जुन्या ४८ वाहनांचा वापर बंद करण्यात आला असल्याने वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टायर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी या लेखाशिर्षात रु.११० लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन रु.५० लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व महानगरपालिकेच्या वाहनांनासाठी पेट्रोल, डिझेल व ऑईल इत्यादी खरेदी या लेखाशिर्षात रु.१२१ लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन रु.५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे कामीच्या पुर्नविनियोजन प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली आहे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. विजयकुमार म्हसाळ, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेकामी वाहन विभागातील इतर लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(श्री. विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**(श्री. अनिल प्रधान)**
**नगरसचिव**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता**
**मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबच्या ई निविदेतील कमी दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव..**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. इतके आहे. मनपा कार्यक्षेत्रामध्ये ३४८ कि.मी. इतक्या लांबीच्या वेगवेगळ्या व्यासाच्या जलवाहिन्या ३० ते ३५ वर्ष जुन्या आहेत. सदर जलवाहिन्यांच्या निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

मनपाच्या कार्यक्षेत्रात दररोज व्हॉल्व नादुरुस्तीच्या, पाईपलाईन लिकेज, नळाद्वारे येणारे घाण पाणी, पाईपलाईन चोकअप इत्यादी प्रकारच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका व नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते व पाणी पुरवठा सुरळीत ठेवावा लागतो. मनपा कार्यक्षेत्रामध्ये शांतीनगर, वऱ्हाळा जी एस आर, नारपोली जी.एस.आर., कामतघर, आझादनगर, एस.टी .स्टँन्ड ई.एस.आर, आय.जी.एम. ई.एस.आर., नागांव, नेहरु नगर, नवी वस्ती व कोंबडपाडा इत्यादी ठिकाणी झोन निहाय जलकुंभाद्वारे व बायपास जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा केला जातो. सदर झोन निहाय पाणी पुरवठा करणाऱ्या व्हॉल्व पुर्णतः खराब झाल्यास किंवा बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्ती करणे किंवा आवश्यक असल्यास नविन व्हॉल्व बसविणे गरजेचे असते तसेच शहरातील मुख्य वितरण वाहिन्या नादुरुस्त होवून गळती झालेस तातडीने जलवाहिनी दुरुस्तीकामी साहित्याची आवश्यकता भासते. सद्या मनपाच्या भंडारगृहात जलवाहिनी दुरुस्ती साहित्य (उदा. स्पेशल्स, व्हॉल्व, टी, रेडूसर, फ्रौन्ड, जीपी जॉईन्ट व इतर सुटे किरकोळ साहित्य) उपलब्ध नसल्यामुळे आवश्यकते नुसार नविन साहित्य मागविणे आवश्यक आहे. तसेच गणमेटल,चेकनट,स्पींडलचे दर जिल्हा दरसुचीमध्ये उपलब्ध नसल्याने दरपत्रक मागवुन सदरचे दर बाजार भावाप्रमाणे घेण्यात आलेले आहेत.

मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे बाबतच्या कामांस दि. ०३/०४/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| | **सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत.** | **रु. ९५,००,०००/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सदर कामा करीता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून निदेतील निविदाकारांनी ऑनलाईन सादर केलेले कागदपत्रांची पडताळणी करून उक्त निविदाकारांपैकी एक अपात्र ठरविण्यात आले असून उर्वरित दोन निविदाकारांचे प्राईजबिड उघडण्यात आले असता मे. बाबुलाल एस. पटेल या निविदाकारांनी निविदेमध्ये भरलेले दर अंदाजत्रकीय दरापेक्षा सर्वात कमी प्राप्त झालेलेआहे.

मे. बाबुलाल एस पटेल यांना सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता रु. ९५,००,०००/- पर्यंतच्या मर्यादेत साहित्य पुरविणेबाबच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्र.** 220 **दिनांक :-** 30/06/२०२३

सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव, कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाच्या सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत निविदेतील सर्वात कमी दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**